शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.०९/२०२२

श्रीमती निलिमा शरद व्हटकर
रा.१२६/बी वॉर्ड वाय.पी.पोवारनगर, कोल्हापूर. } तक्रार अर्जदार

विरूध्द्

१. डॉ.डी.वाय.पाटील प्रतिष्ठान, ताराबाई पार्क, कोल्हापूर.
२. डॉ.डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, कसबा बावडा, कोल्हापूर. } वि.प.

डॉ.डी.वाय.पाटील प्रतिष्ठान, ताराबाई पार्क, कोल्हापूर यांचे डॉ.डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, कसबा बावडा, कोल्हापूर येथील शिक्षिका श्रीमती निलिमा शरद व्हटकर यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.१२/०४/२०२२ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

०१ जुलै २०१६ पासून ते आज अखेर पर्यंतचा D.A व त्याचा फरक अद्याप संस्थेने दिलेला नाही. तसेच वारंवार लेखी अर्ज देवून तोंडी सांगूनही ७ वा वेतन आयोग अद्याप मला न दिले बद्दल/न लागू केले बद्दल तक्रार अर्ज आहे. मी दिलेल्या अर्जाबाबत आज अखेर कोणतेही लेखी उत्तर दिलेले नाही. २ वर्ष Vacation दिलेल्या नाहीत व E.L मध्येही convert केलेल्या नाहीत.

**संस्था/महाविद्यालयाचा अभिप्राय :**

१. मागील दोन वर्षामध्ये कोरोनामुळे विद्यार्थ्यांकडून फी ची वसूली Installment मध्ये केली जात आहे, तसेच मागील २ वर्षामधील शिष्यवृत्ती रक्कम शासन स्तरावर प्रलंबित आहे.

२. सर्व खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयामध्ये ७ वा वेतन आयोग लागू करणेसंदर्भात विचारविनिमय चालू आहे.

३. महाविद्यालयामध्ये एनबीए नामांकनासाठी प्रस्ताव दाखल केला होता, सदर नामांकनासाठी समितीने महाविद्यालयास जून २२ मध्ये भेट दिली. महाविद्यालयाने २१-२२ च्या शैक्षणिक वर्षात फेब्रुवारी २२ मध्ये १५ दिवस व जून २२ मध्ये १५ दिवसांचे व्हेकेशन दिलेले आहे.

**समितीची निरिक्षणे :**

प्रस्तूत तक्रार अर्जामध्ये तक्रारदार यांनी दि.०१ जुलै २०१६ ते अर्ज दाखल दिनांकापर्यंतचा डी. ए. (महागाई भत्ता) व त्याचा फरक अद्याप संस्थेने अदा केला नाही, तसेच सातवा वेतन आयोग लागू केलेला नाही, तसेच दोन वर्ष व्हेकेशन दिलेल्या नाहीत तसेच त्या अर्जित रजेमध्येही (convert) केलेल्या नाहीत इत्यादी तक्रारी नमूद केल्या आहेत.

१. संस्थेने तक्रारीच्या अनुषंगाने समितीकडे सादर केलेल्या लेखी निवेदनामध्ये संस्था व तक्रारदार यांच्यामध्ये झालेल्या दि.२०/०९/२०१९ रोजीच्या समझोता कराराची प्रत जोडली आहे. सदर करारामधील मजकुर अवलोकनी घेता तक्रारदार यांनी दाखल केलेल्या याचिकेमध्ये दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने संस्था व तक्रारदार दोन्ही पार्टीच्या समंतीने करार केला आहे. करारामध्ये नमूद केलेली याचिका तक्रारदार यांना सहावा वेतन आयोग लागू करून त्यानुसार असणारे अनुषंगीक लाभ लागू करणेकरिता याचिका दाखल केली होती. मा. उच्च न्यायालयाने तक्रारदार यांची याचिका मंजूर करून त्यांना सहावा वेतन आयोग व त्या अनुषंगाने असणारे लाभ देण्याबाबत आदेश केले होते. तथापि संस्था व तक्रारदार यांच्यामध्ये सदर निर्णयाच्या अनुषंगाने तक्रारदार यांना ठरावीक रक्कम अदा करून त्या मोबदल्यात त्यांनी तक्रारदार यांची देयक व इतर फायदयाबाबत आता कोणतीही तक्रार नाही त्याबाबत असणारे सर्व हक्क त्यांनी सोडून दिल्याबाबत त्या करारामध्ये लिहून दिले असल्याचे नमूद केले आहे.

संस्थेच्या म्हणण्यानुसार तक्रारदारांने सदर लेखी करारामध्ये त्यांना देय असणारे देयके व इतर अनुषंगीक लाभ या कराराव्द्वारे सोडून दिलेले आहेत. सबब त्यांची महागाई भत्ता व सातवा वेतन आयोग लागू करण्याची मागणी ग्राहृय धरता येणार नाही. समितीने मा. उच्च न्यायालयामधील याचिका क्र.२९८७/२०१७ मधील दि.१८/०४/२०१९ रोजीचा आदेश अवलोकनी घेतला असता सदर आदेश सहावा वेतन आयोग व त्यानुसार असणारे अनुषंगीक लाभ मिळण्याबाबत दिसून येतो. तक्रारदार व संस्था, महाविद्यालय यांच्यामध्ये झालेल्या दि. २०/०९/२०१९ च्या समझोता करारामधील मुद्दे अवलोकनी घेता तक्रारदार यांनी सदर निर्णयानुसार होणारी देयक व त्या अनुषंगीक लाभ करारामधील मधील क्रं.३ कलमानुसार सोडुन दिलेले आहेत. परंतू समितीच्या मते तक्रारदार यांची दि. ०१/०७/२०१६ पासून महागाई भत्ता लागू करून त्याचा होणारा फरक व सातवा वेतन आयोग लागु

करणे या दोन्ही मागण्यास उपरोक्त करारामधील कलमे लागु होत नाहीत कारण हे दोन्ही विषय भिन्न आहेत व करारामधील मजकुर यास आडकाठी होऊ शकत नाही. तसेच संस्थेकडून लवकरच सातवा वेतन लागू करण्याची बाब विचाराधीन असल्याचे समितीसमोर कथन करण्यात आले आहे.

सबब समिती या निष्कर्शास येते की, तक्रारदार यांची सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबतची मागणी योग्य व कायदेशीर आहे. सबब सातवा वेतन आयोगानुसार असणारे वेतन व त्याचे अनुषंगीक लाभ तक्रारदार यांना दयावे लागतील असे या समितीचे मत आहे.

२. कोराना महामारीच्या काळामध्ये घराबाहेर पडण्यास प्रतिबंध होता. त्या काळामध्ये ते कर्मचारी कार्यालयात जाऊन काम करू शकत नव्हते. कोरोना काळातील लॉकडावून काळातील कर्मचाऱ्यांच्या उपस्थिती अथवा अनुपस्थिती बाबत कोणताही ठोस धोरणात्मक निर्णय अद्यापही घेण्यात आलेला नाही. शासन व विद्यापीठ स्तरावर याबाबत धोरणत्मक निर्णय झालेचे दिसून येत नाही. ही बाब तक्रारदार यांनी मान्य केली आहे की, त्यांना त्या कालावधीकरिता अर्धवेतन मिळाले आहे. याचाच अर्थ तक्रारदार यांची कार्यालयीन अनुपस्थिती अर्धवेतनी रजा धरण्यात आली आहे. सदर कालावधी जर वेतन किंवा अर्ध वेतनी रजा धरण्यात आली असेल तर व्हेकेशनचा कालावधी ठरविण्याकरिता ती कार्यालयीन उपस्थिती धरण्यात येवु शकत नाही. व्हेकेशन ठरविण्याकरिता हे सुत्र आहे ती संस्थेने त्यांच्या म्हणण्यामध्ये मांडली आहेत. युजीसी यांच्या स्टॅण्डर्ड नॉर्म्स २०१२ व २०१८ नुसार महाविद्यालयामध्ये आठवडयाचे जर सहा दिवसाचे कामकाज असेल तर एका शैक्षणिक वर्षामध्ये १० आठवडयाचे व्हेकेशन दिले जाते व आणि जर पाच दिवसाचे कामकाज असेल तर शैक्षणिक वर्षामध्ये सहा आठवडयाचे व्हेकेशन दिले जाते. महाविद्यालय प्रत्येक महिन्याच्या दुसरा व चौथ्या शनिवारी सुट्टी देते त्याचे वर्षाअखेर एकूण २६ दिवस होतात. तसेच सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षामध्ये हिवांळी सुट्टी ३१ दिवस व उन्हाळी सुटटी ३४ असे एकूण ६५ दिवसाचे व्हेकेशन दिले आहे. तरी वरील सुटटयांचा विचार करता तक्रारदार यांना सन २०२२-२३ मध्ये ९० दिवसांची सुटटी दिली आहे. ७० दिवसांच्या एवढे व्हेकेशन धरता २० दिवसांची अधिक सुट्टया तक्रारदार यांना दिल्या आहेत.

उपरोक्त सुत्रामुळे तक्रारदार यांचे म्हणणे मान्य होऊ शकत नाही किंबहुना त्यांची कार्यालयीन अनुपस्थिती ही उपस्थिती धरावयाची झाली तरी देखील त्यांच्या म्हणण्याप्रमाणे तक्रारदार व्हेकेशनला पात्र ठरत नाही आणि जर ती पात्र ठरू शकत नाही तर तो कालावधी हा अर्जीत रजेमध्ये (convert) होऊ शकत नाही. त्यामुळे समितीच्या मते तक्रारदाराची ही मागणी कायदेशीर वाटत नाही व ती नामंजूर करावी लागेल सबब खालीलप्रमाणे आदेश.

# आदेश

तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

१. तक्रारदाराची बाबत आणि विकल्पतेकरून ते अर्जित रजेमध्ये रूपांतरीत करण्याची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

२. संस्थेने सातव्या वेतन आयोग लागू करण्याबाबत दिलेल्या निवेदनानुसार लवकरात लवकर सातवा वेतन आयोग लागू करावा व त्याचे लाभ तक्रारदारासही द्यावेत. तसेच या अनुषंगाने देय असणारा फरक सर्वांसमवेत तक्रारदारासही अदा करावा.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधितांना देवून तसे कळविण्यात यावे.

दिनांक : 27 SEP 2023

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

Ankalekar
सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)